N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैराग
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0467 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/10/2024 06:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 30/10/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/10/2024
**Time From (वेळेपासून):** 12:41 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/10/2024 **Time (वेळ):** 06:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/10/2024 06:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उस्मानाबाद चौक वैराग,बार्शी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विजयकुमार चंद्रकांत उबाळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तुळशीदास नगर वैराग,बार्शी,वैराग,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तुळशीदास नगर वैराग,बार्शी,वैराग,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9623050521

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितिश अनिल काळे | | | 1. प्लट नं11, यश नगर रो हाऊस ,जुळे सोलापुर ,वैराग,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्यादी जबाब दि.31.10.2024

मी विजयकुमार चंद्रकांत उबाळे, वय-37 वर्षे, व्यवसाय- मजुरी, रा. तुळशीदास नगर, विठ्ठल मंदिरजवळ, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर, रा. तुळशीदास नगर, विठ्ठल मंदिरजवळ, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर, सध्या रा. मुं.पो. अकोले मंद्रुप, क्षिरसागर वस्ती, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर. मो.नं.9623050521 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहण्यास असुन मजुरी करून त्यावर माझा व माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो. दि.24/09/2024 रोजी माझे व इतर 03 जणांविरूध्द वैराग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.389/2024 भा.न्या.सं, 2023 कलम 118(2), 126(2), 3(5), 351(3), 352 अन्वये गुन्हा दाखल असून, सदर गुन्हात मला अटक करण्यात आली होती. त्यावेळी मी सदर गुन्हयाचे पोलीस कोठडीमध्ये व न्यायलयीन कोठडीमध्ये बार्शी सब जेलमध्ये असताना मला सदर तपास अधिकारी पोनि मोरे साहेब व त्यंाचे डी.ओ पोलीस काळे साहेब यांनी सदर गुन्हातून जामीन लवकर मिळण्यासाठी मदत करतो म्हणून माझ्याकडे वेळोवेळी 1,50,000/- रूपयांची मागणी होती. त्यावेळी माझा मोबाईल गुन्हाच्या तपासकामी जप्त असल्याने व पैसे बँक खात्यामध्ये असल्याने मी माझे जामीन झाल्यानंतर बघू असे सांगितले होते. त्यानंतर दि.25/10/2024 रोजी कोर्टाकडून सदर गुन्हयात मला जामीन मिळाले होता. सदर जामीन ऑर्डरमध्ये दर रविवारी पोलीस स्टेशन येथे हजेरी देण्याबाबत तसेच सदर गुन्हयाचे चार्जशिट कोर्टात दाखल होईपर्यंत तुलसीदास नगर, वैराग येथे प्रवेश करु नये अशा अटींवर माझा जामीन झाला होता. त्याप्रमाणे जामीन झाल्यानंतर मी माझे सासरं मुं.पो. अकोले मंद्रुप, क्षिरसागर वस्ती, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथे राहण्यास गेलो. रविवार दि.27/10/2024 रोजी मी हजेरीकरीता वैराग पोलीस स्टेशन येथे गेलो असता, तेथे माझी पोनि/मोरे साहेबांशी भेट झाली. त्यावर ते मला "बर झाल तुझां जामीन झाला, आता तुला दुस-या गुन्हात आत घालायच आहे आणि यापुढे तुला वैरागमध्ये राहू देत नाही " असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी मी त्यांना माफ करा साहेब यापुढे माझ्याकडून चुक होणार नाही असे सांगितल्यावर त्यांनी मला हजेरी देण्याकरीता पाठवले. त्यानंतर मी हजेरी देण्याकरीता जात असताना मोरे साहेब पुन्हा माझ्या मागे येऊन तू माझ्या सांगीतलेल्या कामाची पूर्तता केली नाही असे म्हणून मला शिवीगाळ केला. त्यावेळी मी आता माझ्याकडे पैसे नाहीत एक-दोन दिवसात देतो असे त्यांना सांगितले. त्यानंतर मी हजेरी देऊन पोलीस स्टेशनमधून निघून गेलो.

माझा मोबाईल पोलीस स्टेशनला जप्त करण्यात आल्याने मी सध्या माझे मेव्हणे श्री सागर दत्तात्रय क्षिरसागर यांचे मोबाईल वापरत असून, त्याचे मो.नं.9623050521 असा आहे. माझ्यावर दुसरा गुन्हा दाखल करतो असे म्हणाल्याने मी घाबरून दि.27/10/2024 रोजी पोनि मोरे यांचे डि.ओ काळे साहेबांना वरील मो.क्र. वरुन त्यांचा मो.नं 8010783694 यावर फोन करुन, मोरे साहेब दुस-या गुन्हयात अडकवतो असे संागत आहेत असे त्यांना सांगितले असता, त्यांनी मी साहेबांना बोलतो, साहेब किती बोलले तेवढे देऊन टाका मी गुन्हा दाखल होऊ देत नाही असे मला सांगितले. त्यावेळी मी काळे साहेबांना माझ्याकडे सध्या दिड लाख रूपये नसल्याचे सांगितले असता, त्यांनी मला तु भेटायला ये मग बोलू असे सांगितले. त्यानंतर आज दि. 30/10/2024 रोजी सकाळी मी अंघोळीला गेलो असताना, अंदाजे 08.30 वाजेच्या सुमारास मला काळे साहेबाचा मिस्डकॉल दिसला. त्यामुळे मी त्यांना अंदाजे 09.30 वाजता कॉल केला असता, त्यांनी मला साहेबांचे पैसे घेवून आज वैरागला भेटायला ये असे सांगितले. वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार काळे साहेब हे पोनि श्री मोरे साहेब यांच्यासाठी म्हणून माझ्याकडे माझ्या विरोधात वर नमूद प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयातून मला जामीन होण्याकरीता मदत केल्याचा मोबदला व माझ्या विरोधात नवीन गुन्हा दाखल न करण्याकरीता मागणी करीत असलेली 1,50,000/- रु. रक्कम ही कोणतेही शासकीय फी किंवा दंड नसून ते माझ्याकडे लाचेची मागणी करीत असल्याचे माझी खात्री झाली,

त्यामुळे मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर येथे समक्ष हजर राहून तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचासमक्ष माझी तक्रार कथन करण्यास सांगितले असता, मी वरीलप्रमाणे माझी तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रार पोनि पिंगुवाले व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्या केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि पिंगुवाले यांनी मला पोनि मोरे साहेब व पोलीस काळे यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, ते वैराग पोलीस स्टेशन येथे भेटू शकतात असे मी सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी वैराग येथे जाऊन पडताळणी करावे लागेल असे सांगितले असता मी त्यांना वैरागच्या अलीकडे राळेरास-धामणगाव रोडवर जाऊन थांबतो तुम्ही तिकडे या असे सांगितलो आणि मी माझ्या कारमधून राळेरास ते धामणगाव या रोडवर जाऊन थांबलो. काही वेळाने सदरठिकाणी पोनि पिंगुवाले, दोन्ही पंच व त्यांचा स्टाफ असे येऊन माझी भेट घेतली. सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून कविटकर व पंच क्र.2 म्हणून माने असे काम करायचे ठरले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर पोलीस काळे साहेब यांनी मला आजरोजी भेटायला बोलावले असल्याने त्यांना फोन करून भेटायला येत असलेबाबत सांगुन ते कुठे आहेत असे विचारण्यास सांगितले. त्यावेळी मी पोलीस काळे साहेबांना त्यांचे 8010783694 यावर फोन करून स्पीकर चालू ठेवला त्यावेळी मी त्यांना पोलीस स्टेशनकडे येऊ का असे विचारले असता त्यांनी मला दुस-या कामांत आहे, आल्यावर फोन करतो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना शिवाजी चौक वैराग येथे आल्यावर परत कॉल करतो असे सांगितले. सदरचे संभाषण पोनि पिंगुवाले यांनी रेकॉर्ड करून घेतले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पोनि मोरे साहेब व पोलीस काळे साहेब या दोघांची पडताळणी करण्यासाठी भेट घेण्यास सागून पंच क्र.01 कविटकर व मला सर्व आवश्यक सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या पॅन्टच्या चोर खिशात ठेऊन 13.01 वा चे सुमारास माझ्याकडील कारमधून रवाना केले. पंच क्र.01 कविटकर व मी असे दोघे वैरागमधील शिवाजी चौकातील कोले कॅन्टीनमध्ये जाऊन थांबलो. काहीवेळाने मी पोलीस काळे साहेबांना फोन करून मी कोले कॅन्टीनजवळ उभारलो असे सांगितलो असता त्यांनी मला पाच मिनिट थांबण्यास सांगितले. काहीवेळाने पोलीस काळे हे त्यांचे मोटार सायकल क्र. म्त 13 कक 8329 यावरुन कोले कॅन्टीनजवळ येऊन त्यांच्या दुचाकीच्या मागे उस्मानाबाद चौकात येण्यास मला सांगितले. त्यावेळी मी व पंच क्र.01 कविटकर दोघे माझ्या कारमधून पोलीस काळे यांच्यापाठीमागे उस्मानाबाद चौकात गेलो. त्यावेळी पोलीस काळे साहेबांनी मला माझ्या कारमधून खाली येण्यास सांगितले आणि माझ्या सोबत असलेल्या पंचास गाडीतच थांबण्यास इशारा करून सांगितले. त्यामुळे मी एकटा कारमधून खाली उतरून त्यांची भेट घेऊन कामाच्या अनुषंगाने चर्चा करत असताना मी पोलीस काळे साहेबांना काय करायला पाहिजे तुमच म्हणण काय असे विचारलो, त्यावर त्यांनी बोललो मी त्यादिवशी साहेबांना.. मग.. ठिकाय बघू म्हणले.. झाल्यावर बघू म्हणले.. असे सांगितले. त्यावर मी झाल्यावर म्हणजे? असे विचारलो असता त्यांनी दिड लाख असे सांगितले. त्यावर मी त्यांना किती म्हणले सरळ सांगा की असे विचारलो तेव्हा त्यांनी कस हाय गाववाल.. किती सांगितल.. असे बोलले.. तेव्हा मी दिडच ठरवलय असे विचारलो असता फिक्स आहे असे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी त्यांच्याशी चर्चा करताना तुम्हाला मी म्हणल्यात तेवढ¬ात बघा की असे म्हणून तडजोड केली असता त्यांनी किती असे विचारले. तेव्हा मी एक लाख रूपये असे सांगितले, त्यानंतर काहीवेळ चर्चा झाल्यानंतर मी पोलीस काळे यांना पोनि मोरे साहेबांची भेट घालून देण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी हे काम झाल्यावर भेट घालून देतो असे सांगितले. त्यावेळी मी पोलीस काळे यांना पोनि मोरे साहेबांची भेट घेतल्यावर पैश्याचे विषय त्यांच्यासमोर बोलायचा कि नाही याबाबत विचारणा केली असता, पोलीस काळे यांनी नाय नाय काय गरज नाय असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.01 तिथून परत निघालो, मी पोनि पिंगुवाले यांना पडताळणीनंतर बार्शी रोडवरील पानगावजवळ रस्त्याच्या कडेला थांबण्यास सांगितले असल्याने त्याप्रमाणे तिकडे जाऊन भेट घेतली आणि घडलेली हकिकत सांगितली. पोनि पिंगुवाले यांनी पंच क्र.01 कविटकर व मला घडलेली हकिकत विचारून घेतली त्यानंतर त्यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये मी व पंचाने सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले.

सदरवेळी पोलीस काळे साहेब हे उस्मानाबाद चौकात भेटले असल्याने सदरवेळी मी त्यांना पोनि मोरे यांची भेट घालून देण्याची विनंती केली असता त्यांनी पैसे आणून दिल्यावर साहेबांची भेट घालून देतो असे सांगितल्याने पोनि मोरे यांची पडताळणी झाली नाही, त्यामुळे सापळा कारवाईवेळी त्यांची भेट घेऊन त्यांचेशी चर्चा करावी व त्यांनी लाचेची रक्कम पोलीस काळे यांच्याकडे देण्यास संमती दिल्यास त्याप्रमाणे लाच रक्कम पोलीस काळे यांच्याकडे द्यावी अश्या सुचना पोनि पिंगुवाले यांनी मला दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पोलीस काळे यांच्यावर सापळा

कारवाई करण्याचे ठरवून मी हजर केलेले 1,00,000/- रू. रकमेच्या नोटांना त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी पोलीस काळे यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करून पोलीस स्टेशनला रक्कम घेऊन येत असल्याचे सांगुन ते आणि पोनि मोरे साहेब पोलीस स्टेशनला आहेत का याची खात्री करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पोलीस काळे यांना फोन करून स्पीकर चालू ठेवले व काळे साहेबांना ते मगाशी ठरल्याप्रमाणे एक लाखचे अँडजेस्ट झालय.. मी आलोय पानगावच्यापुढी असे सांगितले असता पोलीस काळे यांनी हा हा.. कुठ? असे विचारले मी पानगावच्या पुढी आलोय आता असे बोललो तसेच पोलीस स्टेशनला येऊ का असे विचारलो असता त्यांना बर बर असे म्हणून त्यांनी होकार दिला. सदरचे संभाषण पोनि पिंगुवाले यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करून घेतले आहे. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी मला सांगितले कि, पोलीस स्टेशनला जावून पोलीस काळे यांची भेट घेवून त्यांच्यामार्फतीने अथवा पोलीस काळे पोलीस स्टेशनला नसल्यास आपण स्वत: पोनि मोरे यांची भेट घेवून माझ्याकडे पोलीस काळे यांच्यामार्फतीने होत असलेल्या लाच मागणीबाबत पोनि मोरे यांची पडताळणी करावी, जोपर्यंत पोलीस काळे यांच्यामार्फतीने किंवा पोनि मोरे यांची प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी होत नाही, तोपर्यंत लाचेची रक्कम पोलीस काळे यांना देवू नये. अशा सूचना देवून सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या पॅन्टच्या चोर खिशात ठेऊन पंच क्र.01 कविटकर यांच्यासह वैराग पोलीस स्टेशनला रवाना केले, सदरवेळी आमचे पाठोपाठ पोनि पिंगुवाले, पंच क्र.02 आणि सापळा पथकातील अंमलदार शासकीय वाहनातुन आमच्या पाठीमागे आले.

मी व पंच क्र.01 कविटकर वैराग पोलीस स्टेशन येथे गेलो त्यावेळी पोनि पिंगुवाले, पंच क्र.02 व सापळा पथकातील अंमलदार हे वैराग पोलीस स्टेशनच्या समोर व बाजुच्या परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच क्र.01 कविटकर दोघे वैराग पोलीस स्टेशनमध्ये गेलो असता तेथे पोनि मोरे साहेब व पोलीस काळे हे हजर नव्हते. मी थोडी वेळ वाट पाहुन पोलीस काळे यांना फोन स्पीकरवर ठेवून बोललो असता, पोलीस काळे हे कामानिमित्त गौडगांव येथे असल्याचे सांगून पंधरा ते विस मिनीटात येतो असे सांगितले. बराच वेळ पोलीस स्टेशनला थांबून पोलीस काळे व पोनि मोरे साहेब आले नाही त्यामुळे मी पोलीस काळे यांना पुन्हा कॉल केला, त्यावेळी त्यांनी मला मगाशी भेट झाली त्या ठिकाणी येण्यास सांगितले, त्यावेळी मी उस्मानाबाद चौक येथे जात असताना पाऊस येत असल्यामुळे माझ्या खिशातील रक्कम काढुन गाडीच्या ड्रावरमध्ये ठेवली. त्यानुसार मी व पंच असे माझ्या कारमध्ये उस्मानाबाद चौकात जात असताना मला परत पोलीस काळे यांचा फोन आला त्यांनी मला विचारले कि, कुठे आहे मी आलो वाट पहात आहे असे त्याने सांगितले. मी आलो पाऊस येत होता म्हणून थांबलो होतो असे सांगितले. थोडया वेळाने आम्ही उस्मानाबाद चौकात जावून पोलीस काळे यांच्यासमोर जवळच थांबलो असता, त्यांनी इशारा करुन पंच क्र.01 कविटकर यांना कारमध्येच थांबण्यास सांगितले, आणि मला त्यांच्या टु व्हिलरवर बसवून थोडे पुढे नेवून उजव्या बाजुस जाणा-या रोडवर अंदाजे 100 मीटर पुढे नेवून थांबले, आमच्यात चर्चा चालू असताना चर्चेदरम्यान काळे यांनी आणा कि असे म्हणून लाच रक्कमेची मागणी केली. त्यावर मी गाडीत ड्रावरमध्ये आहे, पाऊस चालू आहे म्हणून असे सांगितले. त्यावर मी आता गाडी परत इकड आणायची तिथच चला कि, मोजून घेवून जावा असे म्हणालो. त्यावर पोलीस काळे यांनी मला त्यांचे मोटार सायकलवरुन माझ्या कारजवळ घेवून आले व मला घे ना आता मोजायचे कशाला असे म्हणाले. त्यावेळी मी गाडीतून पैसे घेवून माझ्या पॅन्टीच्या उजव्या बाजुच्या शिखात ठेवून त्यांच्या जवळ आलो असता त्यांनी परत मला मोटारसायकलवर बसवून परत थोडे पुढे नेवून उजव्या बाजुस जाणा-या रोडवर अंदाजे 100 मीटर पुढे आधी थांबलेल्या ठिकाणी नेवून थांबले आणि हाताने इशारा करुन माझ्या जवळील पैशाची मागणी केली. त्यांनतर मी माझ्या खिशातील अॅथ्रासिन पावडर लावलेली रक्कम काढून पोलीस काळे यांच्याकडे दिली असता, त्यांनी त्यांच्याजवळील सॅकच्या पुढील कप्प्यामध्ये मी दिलेली रु. 1,00,000/- लाच रक्कम ठेवली. त्यानंतर मी पोनि मोरे साहेबांच्या भेटीबाबत तसेच माझे पोलीस स्टेशन येथे जप्त मोबाईलबाबत चर्चा केली असता, त्यांनी त्यांनी बघू आज मी साहबांना बोलतो, मोबाईलमधला डाटा घेवू दया म्हणतो असे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा पोनि मोरे यांच्या भेटीबाबत विचारणा केली असता त्यांनी बोलतो मी साहेबांना संध्याकाळी मिस कॉल करतो असे सांगून त्यांचे मोटारसायकल चालू करुन मला कारजवळ सोडून पोलीस स्टेशच्या दिशेने निघून गेले. सदरचे ठिकाण हे निर्मनुष्य असल्याने सापळा पथक थोडया अंतराने थांबलेले असल्याने पुर्वनियोजित इशारा देवू शकलो नाही. थोडया वेळाने मी पंच क्र.01 कविटकर यांच्यामार्फतीने सापळा पथकास फोनद्वारे कळविले नंतर सापळा पथक आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले व मला घडलेली हकिगत विचारली असता, मी वरीलप्रमाणे थोडक्यात हकिगत सांगून पोलीस काळे हे लाच रक्कम घेवून त्यांच्या मोटार सायकल वरुन पोलीस स्टेशनच्या

दिशेने गेलेबाबत सांगितले.

त्यानंतर सापळा पथक व मी पोलीस स्टेशनला गेलो असता, पाठिमागच्या बाजूने मोटारसायकल वरुन पोलीस काळे हे आल्याचे दिसल्याने तात्काळ त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी पोलीस काळे यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव नितिश अनिल काळे, वय-33 वर्षे, पद- पोलीस कॉन्स्टेबल ब.नं.1171, नेम- वैराग पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण, राहणार- प्लॉट नं.11, यश नगर रो हाऊस, रेणुका नगरी, जुळे सोलापूर, सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोलीस स्टेशनच्या वायरलेस रुममध्ये पोलीस काळे यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत करुन सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी दि.30/10/2024 रोजी 12.41 ते 19.05 वा चे दरम्यान लोकसेवक नितिश अनिल काळे, वय-33 वर्षे, पद- पोलीस कॉन्स्टेबल ब.नं.1171, नेम- वैराग पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण, राहणार- प्लॉट नं.11, यश नगर रो हाऊस, रेणुका नगरी, जुळे सोलापूर, सोलापूर यांनी मौजे वैराग गांवचे हद्दीत उस्मानाबाद चौक येथे माझ्या विरुध्द दाखल गुन्हयात जामीन होण्याकरीता मदत केल्याचा मोबदला व माझ्या विरोधात नवीन गुन्हा दाखल न करण्याकरीता म्हणून पोनि मोरे यंाच्याकरीता व स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन 1,50,000/- रू लाच मागणी करून तडजोडीअंती रु.1,00,000/- स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन् केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NIVRUTTI HANUMANT MORE(I (Inspector)) / PCMAH88888

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NIVRUTTI HANUMAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PCMAH88888